


# परळी संघर्षनेता

समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.



https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 101 | बुधवार दि. 06 मे 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060


# जिव्हारी लागणाऱ्या पराभवानंतर ममता बॅनर्जींच्या दोन महत्वाच्या घोषणा

## घटनात्मक पेच निर्माण होणार का?



पश्चिम बंगालमधील पराभवानंतर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी मंगळवारी पहिल्यांदाच मीडियासमोर आल्या. पत्रकार परिषदेत त्यांनी निवडणूक निकालावरुन थेट केंद्रीय निवडणूक आयोगालाच व्हिलन बनविले. आमचा निवडणुकीत पराभव झाला नाही, निवडणूक आयोगाच्या मदतीने आम्हाला हरविण्यात आले, असे म्हणत ममतांनी भाजपविरोधात रणशिंग फुंकले आहे. ममता बॅनर्जी यांनी यावेळी दोन महत्वाचे निर्णय जाहीर केले. निवडणुकीच्या निकालानंतर केरळचे काळजीवाहू मुख्यमंत्री पी. विजयन यांनी सोमवारीच पदाचा राजीनामा राज्यपालांकडे सोपविला. तर तमिळनाडूचे काळजीवाहू मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी आज राजीनामा दिला. त्यामुळे तुम्ही राजीनामा देणार का, असा प्रश्न ममता बॅनर्जी यांना विचारण्यात आल्या. त्यावर त्यांनी प्रश्नच उद्भवत नाही, असे उत्तर दिलेराजीनाम्यावर बोलताना त्या म्हणाल्या, नैतिकदृष्ट्या आमचा विजय झाला आहे. त्यामुळे लोकभवनमध्ये जाऊन राजीनामा देणार नाही. आम्ही निवडणूक हरलो नाही, निवडणूक आयोगाच्या मदतीने आमचा पराभव करण्यात आला. आमची लढाई भाजपविरोधात नव्हे तर निवडणूक आयोगाविरोधात होती. आयोगाने भाजपसाठी काम केले. आता पक्षाच्या सदस्यांसोबत पुढील रणनीतीवर चर्चा केली जाईल. मी आता भाजपचे अत्याचार सहन करणार नाही. रस्त्यांवर ही लढाई लढेन, असेही ममता बॅनर्जी यांनी सांगितले.ममता बॅनर्जी यांनी कोणतीही पोटनिवडणूक लढणार नसल्याची घोषणाही आज केली. आपण आता मुक्त पक्षी आहोत, असे सांगत त्यांनी इंडिया आघाडीला भाजपविरोधात एकजुट करणार असल्याचे सांगितले. मागील निवडणुकीत नंदीग्राम मतदारसंघातून त्यांचा पराभव झाला होता. मात्र, पक्षाला बहुमत मिळाले होते. त्यानंतर भवानीपूर मतदारसंघातून पोटनिवडणूक लढवत मुख्यमंत्रिपद शाबुत ठेवले होते. याच मतदारसंघातून त्या आता पराभूत झाल्या आहेत. भाजपचे नेते सुवेंदु अधिकारी हे

पान 3 वर

# चना खरेदीस 29 मे पर्यंत मुदतवाढ, धनंजय मुंडेंची मागणी केंद्र सरकारने केली पूर्ण

## मुदतवाढ मागितली 15 मे पर्यंत, शिवराज सिंह चौहान यांनी मुदतवाढ दिली 29 मे पर्यंत



मुंबई (प्रतिनिधी) - राज्यात चना (हरभरा) खरेदीस शासकीय खरेदी केंद्रावर 15 मे पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, तसेच पोर्टलवर याबाबत नोंद करण्यात मुदतवाढ देण्यात यावी या माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या मागणीस थेट केंद्र सरकारने मान्यता दिली असून शासकीय हमीभाव चना खरेदी केंद्रांवर आता 29 मे पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

2 9

एप्रिल पर्यंत नाफेड द्वारा संचालित शासकीय केंद्रांवर चना खरेदीस शासनाने दिलेली मुदत 24 एप्रिल रोजीच ऑनलाइन नोंदी बंद करून शासनाने थांबवली होती. याबाबत उत्पादक शेतकऱ्यांनी विनंती केल्यानंतर धनंजय मुंडे यांनी राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या सह केंद्र सरकारला लेखी पत्राद्वारे विनंती करुन शासकीय केंद्रांवर किमान 15 मे पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, अशी विनंती केली होती.

केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी याबाबत आज अधिकृत

पान 3 वर

# आज ठळक

## भाजप कॅबिनेट मंत्र्याच्या पीएचा पत्नीचा गळा आवळून खुनाचा प्रयत्न



पुणे : राज्याच्या एका भाजप कॅबिनेट मंत्र्याच्या खासगी स्वीय सहाय्यकाचा (PA) भयानक चेहरा समोर आला आहे. पुण्यात राहणाऱ्या या पीएने केवळ मोबाईल चॅटिंगवरुन झालेल्या वादातून आपल्या पत्नीचा गळा आवळून तिला संपवण्याचा प्रयत्न केला. धक्कादायक म्हणजे, आईला वाचवण्यासाठी आलेल्या चिमुरड्या मुलालाही या बापाने दया दाखवली नाही.

विजय कारंडे असे या संशयित आरोपीचे नाव असून, तो एका भाजप कॅबिनेट मंत्र्याकडे खासगी स्वीय सहाय्यक तसेच ओएसडी (OSD) म्हणून कार्यरत आहे. ही घटना 30 एप्रिल रोजी पुणे स्टेशन परिसरातील क्वीन्स गार्डन येथील त्यांच्या घरी घडली. कारंडे घरी मोबाईलवर कोणासोबत तरी चॅटिंग करत होते, ज्यावरुन पत्नीने सहज विचारणा केली होती.

केवळ पत्नीने विचारणा केली म्हणून विजय कारंडे यांचा राग अनावर झाला. त्यांनी पत्नीला अश्लील शिवीगाळ करत तिचा गळा आवळला. यावेळी आईला वाचवण्यासाठी छोटा मुलगा मध्ये आला, तेव्हा संतापलेल्या कारंडेने क्रिकेटच्या बॅटने मुलाला बेदम मारहाण केली. या हल्ल्यात पत्नी गंभीर जखमी असून त्यांच्यावर सध्या खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

या घटनेनंतर पीडित पत्नीने आधी अहिल्यानगरमध्ये धाव घेत तक्रार नोंदवली होती. मात्र, पान 3 वर

# जे. के. कन्स्ट्रक्शनचा मुस्लिम धर्मीय सामूहिक विवाह सोहळा उद्या

### ➡ नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे - जाफर खान, हाजी राजा खान



**अनेक मान्यवरांची राहणार उपस्थितीत, सोहळ्याची जय्यत तयारी**

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) बांधकाम क्षेत्रात संपूर्ण मराठवाड्यात नामवंत म्हणून ओळख असलेल्या जे. के. कन्स्ट्रक्शनने समाजहिताचा उपक्रम हाती घेतला आहे. राजकारण, सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या खान बंधूंनी मुस्लिम धर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले आहे. उद्या गुरुवार दि. 7 मे रोजी हा शाही विवाह सोहळा संपन्न होत असुन त्याची जय्यत तयारी सुरु आहे. या सोहळ्याला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जे. के. कन्स्ट्रक्शनचे संचालक जाफर खान, उपनगराध्यक्ष हाजी राजा खान यांनी केले आहे.



सामाजिक भान ठेवून, समाजाचे देणे लागतो या भावनेतून जे. के. कंट्रक्शन यांच्या वतीने गुरुवार दि. 7 मे रोजी मुस्लिम पान 3 वर



• बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत विक्रमी मतांनी विजयी झाल्याबद्दल राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय सुनेत्रा वहिनी अजितदादा पवार यांचे आज मुंबई येथे भेटुन अभिनंदन केले, याप्रसंगी आमचे बंधू, नवनिर्वाचित राज्यसभा खा. पार्थ दादा पवार हेही उपस्थित होते. स्व. दादांच्या अकाली निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही, मात्र दादांच्या विकासाचा ध्यास आणि जनकल्याणाचा वसा सुनेत्रा वहिनी अत्यंत निष्ठेने पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध होऊन, स्वतःला झोकून देऊन काम करत आहेत, याचा मनस्वी आनंद होत आहे.

# कुलर मध्ये पाणी टाकताना विजेचा धक्का लागून दुर्दैवी मृत्यू

### परिसरात हळहळ व्यक्त



महेंद्र गोदाम ग्रामीण प्रतिनिधीघाटनांदुर अंबाजोगाई : तालुक्यातील घाटनांदुर येथे कुलरचा शॉक लागून दुर्दैवी मृत्यू झाला आहे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. घाटनांदुर गावात ही दुःखद घटना घडली आहे,नजीर खदीर सय्यद हा सकाळी कामाला जात असताना कुलर मध्ये पाणी टाकत असताना विजेचा शॉक तो कोसळला घरातील व्यक्तींना कळाल्या व त्यांनी अंबजोगाई येथील शासकीय रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले . पान 3 वर

# परळीत भाजपाचा फटाक्यांची अतिषबाजी करत विजयाचा केला आनंदोत्सव



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) पश्चिम बंगाल, आसाम आणि पॉडेचरी या राज्यात भाजपाला ऐतिहासिक विजय मिळाला. ना. पंकजाताई व मा. खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपच्या वतीने शहरात फटाके फोडून, पेढे वाटून आनंद साजरा करण्यात आला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने देशातील निवडणूकांत घवघवीत यश संपादन केले. पश्चिम बंगालमध्ये अभूतपूर्व पान 3 वर

# कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या अडचणी मार्गी लागणार; राज्य सरकारचा महत्त्वाचा निर्णय



नांदेड : राज्यातील कृषी निविष्ठा (खते, बियाणे व कीटकनाशके) विक्रेत्यांच्या प्रलंबित मागण्या आणि व्यवसायातील अडचणी सोडवण्यासाठी राज्य सरकारने सकारात्मक पाऊल उचलले आहे. मंगळवार, 28 एप्रिल 2026 रोजी मंत्रालय परिषद सभागृह येथे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत 'माफदा' संघटनेच्या विविध मागण्यांवर सखोल चर्चा करून महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

खतांच्या लिंकिंगला चाप बसणार अनेकदा खत कंपन्यांकडून विक्रेत्यांना अनुदानित खतांसोबत विनाअनुदानित उत्पादने घेण्याची सक्ती (ङळपज्ञळपस) केली जाते. यावर कडक कारवाई करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. उत्तर प्रदेश सरकारच्या धर्तीवर महाराष्ट्रातही अशा सक्तीला प्रतिबंध करणारे आदेश शासन लवकरच निर्गमित करणार आहे. विक्रेत्यांना दिलासा: नमुने नापास झाल्यास कारवाईतून सवलत कृषी निविष्ठांचे नमुने अप्रमाणित (ऋरळश्र) झाल्यास थेट विक्रेत्यांवर कायदेशीर कारवाई न करता, त्यांना 'साक्षीदार' म्हणून ठेवण्याबाबत नवीन कार्यपद्धती निश्चित केली जाणार आहे. हरियाणा उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा पान 3 वर

# फडणवीसांचे सरकार आपटावेच लागेल-जरांगेंचा इशारा

### एकनाथ शिंदे मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत?



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार आपटावेच लागेल, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.. शिवसेना शिंदे गटात लवकरच खांदेपालट होणार असून काही मंत्र्यांना डच्चू दिला जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली... ठाकरे गटाच्या खासदाराने उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याबरोबर एकाच गाडीतून प्रवास केल्याने राजकीय वर्तुळात तर्कवितर्कांना उधाण आले... मुख्यमंत्री पान 3 वर

# फडणवीसांनी तातडीने राजीनामा द्यावा; त्यांच्यात माणुसकीच राहिलेली नाही : प्रणिती शिंदेंचा आरोप



नसरापूरमधील चिमुरडीवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून करण्यात आला. तसेच, सोलापुरात तीन दिवसांत दहा मर्डर झाले आहेत. सोलापूरसह संपूर्ण राज्याची कायदा आणि सुव्यवस्था बिघडली आहे, त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून गृहमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी खासदार प्रणिती शिंदे यांनी केली आहे. नसरापुरातील अत्याचाराचं प्रकरण घडलेले असताना आमचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (Devendra Fadnavis) हे पान 3 वर

# गेवराई मतदारसंघात सामाजिक उपक्रमांनीमाजीमंत्री बदामराव पंडितांचा वाढदिवस साजरा



गेवराई विधानसभा मतदारसंघातील भाजप नेत, माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांना दैवत मानणाऱ्या गेवराई तालुक्यातील कार्यकर्ते व नागरिकांकडून दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहात त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. गेवराई मतदार संघातील भाजप कार्यकर्त्यांनी गेवराई, माजलगाव आणि बीड तालुक्यात विविध सामाजिक उपक्रम राबविले.

भाजपा नेते, माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या पान 3 वर

# महादेव कोळी, मल्हार कोळी प्रमाणपत्र व जात वैधता प्रश्नासाठी समाजबांधवांचे जिवघेण्या उन्हात तीन दिवसांपासून "अन्नत्याग आंदोलन"

### • आंदोलक आणि जात पडताळणी अधिकाऱ्यांमधील चर्चा निष्फळ, प्रश्न मार्गी लागेपर्यंत अन्नत्यागावर आंदोलक ठाम



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) मराठवाड्यातील महादेव कोळी, मल्हार कोळी बांधवांच्या प्रमाणपत्र व जात वैधता प्रश्नासाठी 8 समाजबांधवांनी जिवघेण्या उन्हात अन्नत्याग आंदोलन सुरु केले आहे. जात पडताळणी अधिकारी आणि आंदोलकांमध्ये आज चर्चा झाली मात्र ती निष्फळ ठरली. तर प्रश्न मार्गी लागेपर्यंत अन्नत्याग आंदोलन मागे घेणार नसल्याच्या भूमिकेवर आंदोलक ठाम आहेत. विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर सुरु असलेल्या अन्नत्याग आंदोलनात वेगवेगळ्या जिल्ह्यातील समाजबाधव सहभागी होत आहेत. आंदोलन सुरु असेपर्यंत समाजबांधवांनी पान 3 वर

# आदर्श पुरस्कार प्राप्त पत्रकार सचिन ज्ञानेश्वर सोनकांबळे



आज जन्मदिवस.., दि.6 मे 2000 हा त्यांचा व त्यानिमित्ताने त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा मी घेतलेला अगदी थोडक्यात आढावा...

पत्रकार सचिन सोनकांबळे यांचा जन्म 6 मे 2000 रोजी माता गवळणबाई व पिता ज्ञानेश्वर यांच्या पोटी एका छोट्याशा खेडेगावात, महातपुरी ता.पुर्णा येथे झाला. पुढे त्यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ताडकळस येथे झाले. घरची परिस्थिती अतिशय हालाकीची होती तरीही त्यांनी हार मानली नाही. त्या नंतर त्यांची बारावी श्री. नृसिंह कनिष्ठ महाविद्यालय ताडकळस येथे झाली आणि बघता बघता त्यांनी BA मध्ये प्रवेश घेतला. शिक्षण चालू असलं तरी गोरगरिबांच्या व्यथा त्यांना ऐकून घेण्यात आणि त्यावर मदतरुपी मलम लावण्यात लहानपणापासूनच रस होता. सहाजिकच मत मांडण्याकडे त्यांचा कल आपोआप वाढला नि नकळत लेखनीशी जवळीक वाढली. मग काय..,याच लेखणीचं बोट धरून ते केवळ एक काम नाही तर छंद म्हणून पत्रकारितेकडे वळले. पुढे

परभणी जिल्हा प्रतिनिधी ' दैनिक सोमेश्वर साथी' साठी त्यांना पद मिळाले. जे आजही जोमाने समाजामध्ये स्वतःची एक वेगळी छाप पाडून आहे. आवडीच्या क्षेत्रामध्ये काम करायला मिळणं यालाही नसीबच लागते. सचिन सर आजही आपल्या लेखणीचं बोट धरून प्रत्येकाच्या घराघरात पोहोचत आहेत. व लोकांचे प्रश्न मार्गी लावत आहेत. सत्कार, सन्मान आपल्या बातमीद्वारे फुलवत आहेत. समस्या, व्यथाही मांडून सहकार्यरूपी समाजाची निस्वार्थ मदत करत आहे. याचा त्यांच्या संपूर्ण परिवाराला सार्थ अभिमान आहे.

सचिन सोनकांबळे हे पत्रकारिता आज जवळजवळ 2017 पासून सांभाळत आहेत. त्यांनी ' आवाज परभणीचा' या न्यूज चैनलपासून ते नंतर ' दैनिक सोमेश्वर साथी' या पेपरचे काम करत आहेत. या क्षेत्रातला ना कुठला वारसा, ना भरगच्च पाठीमागे संपत्ती पण प्रामाणिकतेच्या जोरावर हे कार्य ते आजही तंतोतंत पार पाडताना दिसत आहेत. आणि याचंच फळ म्हणून त्यांना आतापर्यंत राज्यस्तरीय ' आदर्श पत्रकारिता', व ' महाराष्ट्र रत्न पुरस्कार' प्राप्त असे अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. खरंच कष्ट करण्याची तयारी असेल तर यश अगदी हाताच्या अंतरावर भेटतं म्हणतात ते काही खोटं नाही. अत्यंत हालाकीतून वर आलेल्या या सोनकांबळे परिवारासाठी सचिन सर हे आदर्श जपणारे एक गुणी व्यक्तिमत्व म्हणून आज समाजात प्रसिद्ध आहे.

आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या संघर्षमय जीवनाचा आणि प्रामाणिक प्रवासाचा मी घेतलेला अगदी थोडक्यात म्हणजे अगदीच अल्प आढावा होय. त्यांच्यातील प्रामाणिकपणा आणि एकनिष्ठता अशीच पुढल्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरत राहो याच शुभेच्छारुपी शब्दांनी मी माझ्या दोन शब्दांना पूर्णविराम देते...



**लेखिका-**
**कविता पाचंग्रे, पुणे**

## बंजारा समाजातील विद्यार्थी उच्च पदावर न जाण्याची कारणे, समस्या आणि उपाय

### प्रा. डॉ. दिलीप लालू चव्हाण ,रूपचंद नगर तालुका रेनापुर जिल्हा लातूर

**प्रस्तावना:-**

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. येथे अनेक जाती, जमाती, भाषा आणि संस्कृती आढळतात. त्यामध्ये बंजारा समाज हा एक महत्त्वाचा भटक्या आणि अर्धभटक्या जमातींपैकी एक आहे. बंजारा समाज ऐतिहासिकदृष्ट्या व्यापार, वाहतूक आणि पशुपालन यांसारख्या व्यवसायांशी निगडित होता. मात्र, आधुनिक काळात शिक्षण, तंत्रज्ञान आणि प्रशासनाच्या क्षेत्रात झपाट्याने प्रगती होत असताना बंजारा समाजातील विद्यार्थी अजूनही उच्च पदांपर्यंत मोठ्या प्रमाणावर पोहोचू शकलेले नाहीत.

हा विषय केवळ शैक्षणिक मर्यादांपुरता मर्यादित नसून सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि प्रशासकीय अडचणींशी संबंधित आहे. या निबंधामध्ये बंजारा समाजातील विद्यार्थ्यांना उच्च पदावर जाण्यास अडथळे निर्माण करणारी कारणे, त्यांच्यासमोरील समस्या आणि त्यावर उपाययोजना यांचे सखोल विश्लेषण केले आहे.1) बंजारा समाजाची पार्श्वभूमी:-बंजारा समाज हा प्रामुख्याने भटक्या जीवनशैलीसाठी ओळखला जातो. पूर्वी हा समाज मालवाहतुकीसाठी बैलगाड्यांचा वापर करत असे. "लांबाणी" किंवा "गोर बंजारा" म्हणूनही हा समाज ओळखला जातो.स्वातंत्र्यानंतर शासनाने स्थिर जीवनासाठी विविध योजना सुरु केल्या, परंतु अनेक ठिकाणी या योजना पूर्णपणे प्रभावी ठरल्या नाहीत. त्यामुळे शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या संधींमध्ये बंजारा समाज मागे राहिला.2) उच्च पदावर न जाण्याची प्रमुख कारणे(1) शैक्षणिक मागासलेपणा:-बंजारा समाजात शिक्षणाचे प्रमाण तुलनेने कमी आहे. अनेक कुटुंबांमध्ये शिक्षणाला अजूनही प्राधान्य दिले जात नाही.लहान वयातच मुलांना कामावर पाठवले जातेशाळा सोडण्याचे प्रमाण जास्त आहेगुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अभाव(2) आर्थिक अडचणी:-गरीबी ही सर्वात मोठी समस्या आहे.

कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी मुलांना काम करावे लागते

उच्च शिक्षणासाठी लागणारा खर्च परवडत नाहीस्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक साधने (कोचिंग, पुस्तके) मिळत नाहीत

(3) सामाजिक व सांस्कृतिक अडथळे:-पारंपरिक विचारसरणीमुळे शिक्षणाकडे दुर्लक्षमुलींच्या शिक्षणावर मर्यादा

लवकर विवाहाची प्रथा(4) मार्गदर्शनाचा अभाव:-योग्य करिअर मार्गदर्शन मिळत नाहीयशस्वी व्यक्तींचे मार्गदर्शन नसणे

स्पर्धा परीक्षा आणि उच्च शिक्षणाविषयी माहितीचा अभाव(5) भौगोलिक व पायाभूत समस्या:-बंजारा वस्ती बहुतेक वेळा दुर्गम भागात असतेशाळा, महाविद्यालये आणि वाचनालये दूर असतातइंटरनेट आणि डिजिटल साधनांचा अभाव(6) आत्मविश्वासाचा अभाव:-स्वतःच्या क्षमतेवर विश्वास नसणेसमाजातील भेदभावामुळे न्यूनगंड निर्माण होणे(7) भाषेची अडचण:-मातृभाषा आणि शालेय भाषा यामध्ये फरकइंग्रजी भाषेचा अभाव(8) सरकारी योजनांची अपुरी अंमलबजावणी:-योजनांची माहिती नसणेलाभ मिळण्यात अडचणी3) बंजारा विद्यार्थ्यांसमोरील प्रमुख समस्या:-(1) शिक्षणातील असमानताशहरी आणि ग्रामीण भागातील शिक्षणामध्ये मोठी दरी आहे.(2) स्पर्धात्मक वातावरणाचा अभाव:-स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी आवश्यक वातावरण नसणे(3) तांत्रिक कौशल्यांचा अभाव:-डिजिटल शिक्षणात मागे राहणे(4) मानसिक व सामाजिक दबावकुटुंबीयांची अपेक्षाआर्थिक जबाबदाऱ्या4) उपाययोजना:-(1) शिक्षणाचा प्रसार:-प्रत्येक मुलाने किमान माध्यमिक शिक्षण पूर्ण करणे आवश्यकमुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन(2) आर्थिक मदत:-शिष्यवृत्ती योजना वाढवणेमोफत पुस्तके, वसतिगृह सुविधा(3) मार्गदर्शन केंद्रे:-प्रत्येक गावात करिअर मार्गदर्शन केंद्रस्पर्धा परीक्षांसाठी विशेष प्रशिक्षण(4) डिजिटल साक्षरतासंगणक शिक्षणइंटरनेट सुविधा उपलब्ध करणे(5) सामाजिक जागरूकता:-शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगणेबालविवाह रोखणे(6) शासनाची भूमिका:-योजनांची प्रभावी अंमलबजावणीशिक्षणासाठी विशेष आरक्षण आणि सुविधा(7) प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांची निर्मिती:-यशस्वी बंजारा व्यक्तींचे उदाहरण पुढे आणणे(8) स्वयंसेवी संस्थांची मदतशिक्षण आणि कौशल्य विकासासाठी कार्यक्रम5) भविष्यातील दिशा:-बंजारा समाजातील विद्यार्थ्यांनी आधुनिक शिक्षण, तंत्रज्ञान आणि स्पर्धात्मक परीक्षांमध्ये सहभाग वाढवणे गरजेचे आहे.UPSC, MPSC सारख्या परीक्षांमध्ये सहभागव्यावसायिक शिक्षण (Engineering, Medical)उद्योजकतेकडे वळणेनिष्कर्ष:-बंजारा समाजातील विद्यार्थी उच्च पदावर न जाण्याची समस्या ही केवळ एका कारणामुळे निर्माण झालेली नाही, तर ती अनेक घटकांच्या एकत्रित परिणामामुळे निर्माण झाली आहे. शिक्षणाचा अभाव, आर्थिक अडचणी, सामाजिक बंधने आणि मार्गदर्शनाचा अभाव ही प्रमुख कारणे आहेत.परंतु योग्य नियोजन, शासनाची मदत, समाजाची जागरूकता आणि विद्यार्थ्यांची मेहनत यामुळे



ही परिस्थिती बदलू शकते.आज गरज आहे ती एकत्रित प्रयत्नांची. बंजारा समाजातील प्रत्येक विद्यार्थ्याने शिक्षणाला प्राधान्य दिल्यास आणि योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ते नक्कीच उच्च पदांवर पोहोचू शकतात आणि समाजाचा सर्वांगीण विकास साधू शकतात.

# एकत्र कुटुंब पद्धती : नियमांपेक्षा समजूत महत्त्वाची

**डॉ. भारत कऱ्हाड**



भारतीय समाजात एकत्र कुटुंब पद्धती ही केवळ परंपरा नसून जीवन जगण्याची एक संवेदनशील आणि समृद्ध पद्धत आहे. अनेक पिढ्या एकत्र राहून एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होतात, हीच या व्यवस्थेची खरी ताकद आहे. मात्र, आजच्या बदलत्या काळात एकत्र कुटुंब म्हणजे पूर्वीसारखा मोठा समूह राहिलेला नाही; तरीही किमान आई-वडील, मुलगा, सून आणि नातवंडे असे कुटुंब एकत्र राहणे ही एक सकारात्मक आणि आवश्यक बाब ठरते.

एकत्र कुटुंबाबाबत बोलताना अनेकदा आपण नियम, शिस्त, कामांची विभागणी, जबाबदाऱ्या यावर भर देतो. परंतु प्रत्येक गोष्ट काटेकोर नियोजनाने चालवण्याची गरज नसते. घर हे कार्यालय नाही, आणि कुटुंब ही संस्था नाही—ते एक जिवंत नात्यांचं जग आहे. त्यामुळे "कोण काय करणार?" याचा तक्ता तयार करण्यापेक्षा "कोण काय करू शकतो?" ही समजूत अधिक महत्त्वाची ठरते.

ज्याला जे जमेल, ज्याला जे शक्य होईल ते त्याने केलं, आणि थोडासा एकमेकांचा मान राखला, तर घरातील कामे आपोआप पार पडतात. कधी एखाद्याला जास्त काम करावं लागतं, तर कधी दुसरा कमी करतो—पण या छोट्या गोष्टींचा हिशोब ठेवला, तर नात्यांमध्ये ताण निर्माण होतो. कुटुंबात गणित नसतं, तिथे भावनांचा प्रवाह असतो. म्हणूनच थोडं कमी-जास्त चालवून घेण्याची वृत्तीच कुटुंबाला टिकवून ठेवते.

आजच्या काळात एक मोठी समस्या म्हणजे "काम कमी आणि विचार जास्त." अनेकदा माणसं प्रत्यक्ष कामापेक्षा एकमेकांच्या वागण्या-बोलण्यावर जास्त विचार करत बसतात. त्यातून तुलना सुरु होते—"तो असं करतो, ती तसं करते"—आणि याच तुलना नात्यांमध्ये दुरावा निर्माण करतात. प्रत्येक व्यक्तीची परिस्थिती, क्षमता आणि दृष्टिकोन वेगळा असतो, हे स्वीकारणं गरजेचं आहे.

विशेषतः सासू–सुनेच्या नात्यात ही तुलना आणि अपेक्षा यांचा प्रभाव जास्त दिसून येतो. मात्र हे नातं स्पर्धेचं नसून सहजीवनाचं आहे, हे दोघींनीही समजून घेतलं पाहिजे. "मी बरोबर आणि तू चूक" या भूमिकेपेक्षा "आपण एकत्र कसं राहू शकतो?" हा विचार अधिक महत्त्वाचा ठरतो.

यामध्ये सर्वांत संवेदनशील आणि महत्त्वाचा मुद्दा म्हणजे घरातील मुलं. मुलं ही घरातील वातावरणाची आरशी असतात. ते शब्दांपेक्षा वर्तनातून शिकतात. त्यामुळे मुलांसमोर वाद, टोमणे, बोलाचाली टाळणं अत्यंत आवश्यक आहे. खरं तर, गरज नसताना कोणालाही बोलून दुखावण्याची आवश्यकता नसते. काही गोष्टी न बोलता समजून घेणं, सोडून देणं आणि शांत राहणं—हीच खरी शहाणपणाची खूण आहे.

घरात जर शांतता, आदर आणि समजूतदारपणा असेल, तर मुलांची मानसिक जडणघडण सुदृढ होते. त्यांच्यात आत्मविश्वास, संवेदनशीलता आणि नात्यांची जाण निर्माण होते. पण जर घरात सतत तणाव असेल, तर त्याचा परिणाम त्यांच्या मनावर खोलवर उमटतो.

एकत्र कुटुंब पद्धती टिकवण्यासाठी मोठ्या नियमांची गरज नसते; गरज असते ती छोट्या समजुतीची. परस्परांचा मान, थोडी सहनशीलता, आणि अनावश्यक वाद टाळण्याची वृत्ती—या साध्या गोष्टी कुटुंबाला मजबूत बनवतात.

शेवटी, एकत्र कुटुंब म्हणजे फक्त एकत्र राहणं नाही, तर एकत्र विचार करणं, एकमेकांना समजून घेणं आणि एकमेकांसाठी उभं राहणं होय. नियमांपेक्षा नात्यांना प्राधान्य दिलं, तर कोणतंही कुटुंब आनंदी आणि समृद्ध राहू शकतं.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

# बहुजनांना शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही- छ.शाहू महाराज

## (6 मे: छ.शाहू महाराज स्मृती दिन.)

राजर्षी शाहू महाराजांची विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी भेट झाली. बाबासाहेबांच्या मूकनायक या वृत्तपत्रास व पुढे त्यांच्या इंग्लंडमधील उच्चशिक्षणास त्यांनी अर्थसाहाय्य केले. माणगाव व नागपूर येथील अस्पृश्यता निवारण परिषदांत त्यांच्याबरोबर सहभागी होऊन अस्पृश्यांना त्यांचा खरा पुढारी मिळाल्याबद्दल त्यांनी त्यांचा गौरव केला. अस्पृश्यतेबरोबरच जातिभेदाशी त्यांनी अखेरपर्यंत संघर्ष केला. आंतरजातीय विवाह हा जातिभेदावर रामबाण उपाय वाटून त्यांनी आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. स्वत: पुढाकार घेऊन अनेक आंतरजातीय विवाह घडवून आणले. तसेच बालविवाहास प्रतिबंध करून नोंदणी विवाहाचा कायदा जारी केला. घटस्फोटास व विधवापुनर्विवाहास कायदेशीर मान्यता दिली. कुटुंबात होणाऱ्या शारीरिक व मानसिक छळांपासून स्त्रीला संरक्षण देणारा कायदाही त्यांनी मंजूर केला. मागासलेल्या वर्गांतील मुलींना व स्त्रियांना मोफत शिक्षणाची सुविधा निर्माण केली. आपली राजकीय कारकीर्द समस्त समाजांना न्याय देण्यात खर्ची घातली होती, म्हणूनच त्यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून उत्साहाने साजरी केली जाते.

सामाजिक सुधारणांबरोबरच त्यांनी शेतीस व उद्योगधंद्यांस प्रोत्साहन दिले. अनेक कृषी व औद्योगिक प्रदर्शने भरविली. पन्हाळ्यावर चहा, कॉफी, रबर यांच्या लागवडींचे प्रयोग केले. कृषी उत्पादनासाठी शाहूपुरी, जयसिंगपूर यांसारख्या बाजारपेठा वसविल्या. त्यामुळे कोल्हापूर ही गुळाची बाजारपेठ म्हणून देशात प्रसिद्ध पावली. शाहूंनी कोल्हापुरात कारखानदारीचा पाया रचला. शाहू मिलची स्थापना करून आधुनिक वस्त्रोद्योगास त्यांनी चालना दिली. शाहूंनी बांधलेले राधानगरीचे धरण कृषी क्षेत्रात संस्थानचा कायापालट करणारा उपक्रम ठरला. संस्थानी मुलखातील हे सर्वांत मोठे धरण बांधून त्यांनी आपले संस्थान सुजलाम्-सुफलाम् करून टाकले. त्यांनी सहकारी संस्थांचा कायदा करून सहकार चळवळीची मुहूर्तमेढ रोवली.

छत्रपती शाहू महाराज कोल्हापूर महाराष्ट्रातील करवीर तथा कोल्हापूर संस्थानचे प्रागतिक अधिपती आणि थोर समाजसुधारक होत. प्राथमिक शिक्षण, जातिभेद-निवारण, अस्पृश्यता-निवारण आदी सुधारणांचे पुरस्कर्ते होते. त्यांचा जन्म दि.26 जून 1874 रोजी कागलच्या जहागीरदार घाटगे घराण्यात जयसिंगराव आणि राधाबाई या दांपत्याच्या पोटी झाला. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव यशवंतराव होते. चौथ्या शिवाजींच्या अकाली निधनानंतर ते दि.17 मार्च 1884 रोजी कोल्हापूरच्या गादीवर दत्तक गेले. राजकोट व धारवाड येथे त्यांचे शिक्षण झाले. सर फ्रेझर व रघुनाथराव सबनीस यांसारखे गुरु त्यांना मिळाले. विद्यार्थिदशेत त्यांनी इंग्रजी, संस्कृत, इतिहास, राज्यशास्त्र इ. विषयांचा अभ्यास केला. त्यांना दि.2 एप्रिल 1894 रोजी राज्याधिकार प्राप्त झाला. तत्पूर्वी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या कन्येबरोबर सन 1891 साली त्यांचा विवाह झाला. त्यांना राजाराम व शिवाजी हे दोन मुलगे आणि राधाबाई- आक्कासाहेब व आऊबाई या दोन कन्या झाल्या. त्यांनी प्रशासन-यंत्रणेनची पुनर्रचना करून बहुजन समाजातील कर्तबगार व गुणी व्यक्तींना अधिकारावर नेमण्यास सुरुवात केली. सन 1897-98 साली प्रथम दुष्काळ व नंतर प्लेग अशी संकटे कोसळली.

मागासलेल्या जातींत शिक्षणाबद्दल फारशी आस्था नसल्याने व त्याचे कारण शिक्षण घेऊनही सरकारी नोकरी लाभण्याची शक्यता नसल्याने त्यांनी दि.26 जुलै 1902 रोजी कोल्हापूर संस्थानातील 50 टक्के शासकीय नोकऱ्या मागास वर्गासाठी राखीव ठेवल्याचा जाहीरनामा काढला. राखीव जागांचे धोरण अमलात आणणारे ते भारतातील पहिले राज्यकर्ते ठरले. अस्पृश्यतेचे उच्चाटन हे आपले जीवितकर्तव्य मानले. संस्थानातील शाळा, पाणवठे, विहिरी, दवाखाने, कचेऱ्या आदी सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळण्यास त्यांनी कायद्याने प्रतिबंध केला. त्यासाठी अनेक वटहुकूम जारी केले. त्यांनी अस्पृश्यांना सरकारी नोकरीत घेतले. समाजातील तलाठ्यासारख्या प्रतिष्ठेच्या जागा दिल्या. त्यांच्यापैकी अनेकांना माहूत, हूलस्वार, पोलीस, स्वत:चे मोटारचालक म्हणून नेमले. भटक्या व विमुक्त जातींना जवळ करून त्यांचे जीवन स्थिर केले. त्यांना आपले रक्षक म्हणून नेमले. खेड्यापाड्यांतील बलुतेदारांनाही त्यांच्या बलुतेपद्धतीतून मुक्त करून त्यांना समाजातील सर्व उद्योगधंदे खुले केले. जोगिणी व देवदासी प्रथेस प्रतिबंध करणारा कायदा जारी केला.

सन 1902 साली सातव्या एडवर्डच्या राज्यारोहणानिमित्त त्यांनी युरोपचा दौरा केला. तेथील भौतिक प्रगतीचा मोठा प्रभाव त्यांच्यावर पडला; त्यामुळे त्यांचे अनुभवविश्व समृद्ध झाले. बहुजन समाज शिकून शहाणा झाल्याशिवाय त्यांचे दारिद्र, अज्ञान व अंधश्रद्धा नष्ट होणार नाहीत, हे जाणून त्यांनी शिक्षणाच्या, विशेषतः प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारावर भर दिला. त्यानुसार त्यांनी आपल्या संस्थानात सन 1917मध्ये सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला आणि तो अमलात आणला. प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा सुरु केली. ते शिक्षणसम्राट महात्मा फुलेंच्या सत्यशोधक विचारसरणीकडे आकृष्ट झाले. सत्यशोधक तत्त्वांना त्यांचा पाठिंबा होता. मराठ्यांसाठी सन 1920मध्ये स्वतंत्र क्षात्र जगद्गुरु पद निर्माण करून त्यावर सदाशिवराव पाटील या उच्चविद्याविभूषित तरुणास नेमले. त्यांनी संगीत, नाट्य, चित्रकला, मल्लविद्या आदी कलांना राजाश्रय देऊन महाराष्ट्रात कलेच्या क्षेत्रात स्पृहणीय कामगिरी केली. अनेक गायक-गायिकांनी त्यांच्या आश्रयाने भारतभर कीर्ती संपादन केली. त्यांनी अनेक नाटक कंपन्यांना व गुणी कलावंतांना आश्रय दिला. मल्लविद्येच्या प्रांतात त्यांनी संस्थानासह सर्व देशांतील मल्लांना उदार आश्रय दिला. रोमच्या आखाड्याच्या धर्तीवर कोल्हापुरात कुस्तीचे मैदान बांधले. त्यांच्या कारकीर्दीत कोल्हापूर ही मल्लविद्येची पंढरी बनली. दस्तूरखुद्द महाराज हे मल्लांचे मल्ल म्हणून प्रसिद्ध होते. पट्टीचा शिकारी म्हणून त्यांचा लौकिक होता. छ.शाहूंच्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून कानपूर येथे कुर्मी क्षत्रिय सभेने सन 1919 साली त्यांना राजर्षी पदवी बहाल केली. त्यांच्या कार्यामुळे दलित-पतितांचा उद्धारक, रयतेचा राजा म्हणून त्यांची प्रतिमा जनसामान्यात निर्माण झाली. या राजाने अज्ञानी बहुजन समाजाला जागृत करण्याचे व्रत अखेरपर्यंत सांभाळले.

अखेरच्या दिवसांत द्वितीय चिरंजीव शिवाजी यांच्या अपघाती निधनाने सन 1918मध्ये ते खचून गेले, तशातच मधुमेहाने ते ग्रासले होते. अखेर मुंबई येथे दि.6 मे 1922 रोजी त्यांचे वयाच्या अवघ्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यानंतर त्यांचे पुत्र राजाराम महाराज कोल्हापूरच्या गादीवर आले.

!! छ.शाहू महाराज स्मृतिदिन निमित्त त्यांना व त्यांच्या लोककल्याणकारी कार्यांना मानाचा लवून मुजरा !!

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**
**(भारताच्या वैभवशाली इतिहास-अस्मितेचे गाढे अभ्यासक.)**
**मु. रामनगर वॉर्ड नं.20, गडचिरोली.**
**जि.गडचिरोली, फक्त व्हॉट्सअ‍ॅप- 9423714883.**

# अवघ्या 15 व्या वर्षी मोठी झेप

## बीडच्या शौर्य जाधवची एसजीएफआय राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड



श्री गणेश विद्यामंदिर स्कूल व आदर्श क्रिकेट अकॅडमीचा होतकरु क्रिकेटपटू शौर्य शैलेश जाधव याची शालेय राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी(एसजीएफआय) महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातून तसेच बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत शौर्यने ही उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. विशेष म्हणजे, या स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंमध्ये अवघ्या 15 वर्षांचा शौर्य हा सर्वात लहान खेळाडू ठरला आहे.

शौर्य हा उत्कृष्ट ऑलराउंडर असून उजव्या हाताने फलंदाजी तसेच लेग स्पिन गोलंदाजीमध्ये त्याने अनेक सामन्यांत प्रभावी कामगिरी केली आहे. जिल्हास्तरीय उपांत्य (उपांत्य फेरी) सामन्यात त्याने केवळ 17 चेंडूत नाबाद 51 धावांची तुफानी खेळी करत आपल्या संघाला विजय मिळवून देत आपली क्षमता सिद्ध केली होती. शौर्यचा क्रिकेट प्रवास टप्प्याटप्प्याने घडत गेला. सुरुवातीला तालुकास्तरीय सामने बीड येथे पार पडले. त्यानंतर अंबेजोगाई येथे जिल्हास्तरीय निवड चाचणी झाली. पुढे परभणी जिल्ह्यातील सेलू येथे विभागीय निवड प्रक्रिया पार पडली. या सर्व टप्प्यांमध्ये सातत्यपूर्ण आणि दमदार कामगिरी करत शौर्यची छत्रपती संभाजीनगर विभागातून निवड झाली. यानंतर अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी येथे, बालेवाडी क्रीडा आयुक्त व निवड समितीच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र संघाची अंतिम निवड करण्यात आली. या प्रक्रियेत छत्रपती संभाजीनगर विभागातून एकट्या शौर्यचीच निवड होणे ही अत्यंत अभिमानास्पद बाब ठरली. निवड झालेल्या खेळाडूंचा सराव शिबिर लातूर जिल्ह्यात पार पडला असून, आता डञ्ृञ्ऋख राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धा तेलंगणा येथे आहेत. शौर्यच्या या यशामागे त्याचे प्रशिक्षक अझहर शेख, संजय धस आणि सागर सांगळे, फिटनेस कोच नासेर मोमीन यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. तसेच बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव आमेर सलीम, बीड तालुका क्रीडा अधिकारी रेवनाथ शेलार, संतोष राठोड, अनिकेत काळे, जितू आरक, मोहीत परमार बीडजिल्हा क्रिकेट वकील संघ तसेच परभणीचे रोहन औंढेकर, लातूर विभागातील तालूकाक्रीडा अधिकारी जयरामजी मुंढे, एसजीएफआय महाराष्ट्र संघाचे व्यवस्थापक

मुकेश बिराजदार आणि नाशिक जिल्हाक्रीडा अधिकारी कार्यालय अंतर्गत तालूका क्रीडा अधिकारी तथा एसजीएफआय महाराष्ट्र प्रशिक्षक सर्वेश देशमुख यांचेही शौर्यला योग्य मार्गदर्शन लाभले. शौर्य हा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे युवक राज्य उपाध्यक्ष अ‍ॅड.शैलेश जाधव यांचा सुपुत्र असून, त्याने आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर महाराष्ट्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्याच्या या यशाबद्दल कुटुंबियांसह सर्वत्र आनंदाचे वातावरण असून, येथून पूढील स्पर्धेतही तो उत्कृष्ट कामगिरी करेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी अ‍ॅक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

यावेळी नंदीग्राम आणि भवानीपूर या दोन मतदारसंघातून विजय मिळविला आहे. त्यांना एक मतदारसंघ सोडावा लागेल. या मतदारसंघाची पोटनिवडणूक लढवत ममतादीदी विधानसभेत जाऊ शकतात, अशी चर्चा होती. मात्र, त्यांनीच आपण कोणतीही पोटनिवडणूक लढणार नसल्याचे स्पष्ट करत त्यावर पडदा टाकला आहे.ममता बॅनर्जी यांनी राजीनामा दिला असता तर नव्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी होईपर्यंत त्यांच्यावर राज्यपालांनी काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून जबाबदारी सोपविली असती. मात्र, आता त्या राजीनामा देणार नसल्याने घटनात्मक पेच निर्माण होऊ शकते. तशीही त्यांच्या सरकारची मुदत 7 मे रोजी संपत आहे. त्यामुळे त्यांच्या सरकारचा कार्यकाळ त्यादिवशी संपुष्टात येईल. त्याआधीच राज्यपालही त्यांचे सरकार बरखास्त करु शकतात किंवा राज्यात राष्ट्रपती राजवटीची शिफारस करु शकतात. त्यामुळे ममतांनी राजीनामा दिला नाही तरी पुढील सरकारच्या स्थापनेवर त्याचा कोणताही परिणाम होणार नाही.

---------------------------------------

घोषणा केली असून आता चना (हरभरा) उत्पादक शेतकऱ्यांना आपला चना 29 मे पर्यंत ऑनलाइन नोंदी करून शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावर विक्री करता येणार आहे. याबाबत संबंधित शेतकऱ्यांनी आ. धनंजय मुंडे यांच्या सह केंद्र व राज्य सरकारचे आभार मानले आहेत.

------------------------------------

धर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. मलकापूर रोडवरील जे. के. फंक्शन हॉल येथे सकाळी 11 वाजता हा सामूहिक विवाह सोहळा थाटात आणि उत्साहात संपन्न होणार आहे. अनेक गरीब कुटुंब कर्ज काढून लग्न करतात. अनावश्यक खर्च केला जातो. हा अनावश्यक खर्च टाळून गरीब कुटुंब स्वाभिमानाने जगावे यासाठीच या सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे जे. के. कन्स्ट्रक्शनचे संचालक जाफर खान, उपनगराध्यक्ष हाजी राजा खान यांनी सांगितले.

*शाही सोहळ्याची जोरदार तयारी*

जे. के. कंट्रक्शनच्या वतीने समाजातील होतकरू कुटुंबांसाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या शाही थाटात संपन्न होणाऱ्या सामूहिक विवाह सोहोळ्याची जोरदार तयारी सुरु असून ती अंतिम टप्प्यात आली आहे. या सोहोळ्याला अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. सहभागी जोडप्यांना संसारोपयोगी साहित्यही दिले जाते. त्याचीही तयारी पूर्ण झाल्याचे सांगण्यात आले.

या विवाह सोहळ्याला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जाफर खान उस्मान खान, परळीचे उपनगराध्यक्ष हाजी राजा खान उस्मान खान, उमर खान उस्मान खान, एजाज खान उस्मान खान, वाहेद खान जाफर खान, शाहेद खान राजा खान, शेख मझहरुद्दिन अलीमोदिन, जफर खान जाफर खान, नदीम खान जाफर खान, मुफ्ती तारेक खान एजाज खान, फेरोज खान उमर खान, फाजेब खान उमर खान, तौफिक खान एजाज खान यांनी केले आहे.

---------------------------------------

कुलरचा जोरदार विजेचा झटका लागताच तरुणाचा मृत्यू झाला. या दुर्घटनेत 31 वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. या घननेनं परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

. कूलरला स्पर्श करताच त्यांला विजेचा धक्का बसला ही घटना वडील व पत्नीच्या लक्षात येताच त्यांनी विद्युत पुरवठा खंडित केला आणि ग्रामस्थांच्या मदतीने त्यांना उपचारासाठी तातडीने हलवण्यात आलं. माक्ष अंबाजोगाई शासकीय रुग्णालयात पोहोचण्यापूर्वी वाटेतच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी व लहान मुलगी असा परिवार आहे. परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

---------------------------------

यश संपादन केले. याबद्दल परळीत राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे, मा. खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली राणी लक्ष्मीबाई टॉवर चौकात भाजपच्यावतीने जल्लोष साजरा करण्यात आला. फटाक्यांची आतषबाजी करून पेढे वाटप करण्यात आले. यावेळी बांधकाम सभापती प्रा.पवन मुंडे, नगरसेवक प्रीतेश तोतला, कोषाध्यक्ष अनीश अग्रवाल, राजेश्वर देशमुख, प्रकाश जोशी, संदीप लाहोटी,अरुण पाठक,अश्विन मोगरकर,अमोल डुबे,दिलीप नेहरकर ,श्रीपाद शिंदे,योगेश पांडकर,राजेश कौलावर,राहुल केंद्रे,केशव नागरगोजे,विकास हलगे,सुशील हरणगुळ,योगेश मुंडे,बंडू कोरे,प्रल्हाद सुरवसे, ज्ञानेश्वर मुंडे,नितीन समशेट्टी,अच्युत जोगदंड,कृष्णा बेदरकर आदींसह बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

-------------------------------------

फडणवीस यांच्यात काही माणुसकीच राहिली नाही, अशी टीका करीत खासदार प्रणिती शिंदे यांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली... साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या 'नराधमाला हालहाल करुन संपवा', असा संताप राज ठाकरे यांनी व्यक्त केला... या सर्व घडामोडी सविस्तर जाणून घेऊ...राज्यात महिलांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटनांवरुन मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी तीव्र संताप व्यक्त केला. जोपर्यंत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकार सत्तेत आहे, तोपर्यंत राज्यात खून आणि अत्याचाराच्या घटना घडत राहणार आहेत. फडणवीस यांच्या सरकारचे काम राक्षसी वृत्तीने सुरु आहे, त्यामुळे हे सरकार आपटावेच लागेल, असा इशाराही त्यांनी दिला. मनोज जरांगे पाटील सोमवारी रात्री अकलूज येथील धनाजी साखळकर यांच्या निवासस्थानी आले होते. त्यावेळी माध्यमांशी त्यांनी संवाद साधला. राज्यातील वाढत्या गुन्हेगारीच्या घटनांना मुख्यमंत्री, गृहमंत्री जबाबदार असल्याचा ठपका मनोज जरांगे यांनी ठेवला. बीडमधील मस्साजोगचे सरपंच देशमुख यांची हत्या करणाऱ्या आरोपींना तुरुंगात एसी आणि मोबाईलची सेवा दिली जात असल्याचा गंभीर आरोपही जरांगे यांनी केला. या हत्याकांडातील आरोपी कोणाच्या आशीर्वादाने चैनीत आहेत, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत लवकरच खांदेपालट होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. दिवाळीआधी शिंदे गटातील काही नेत्यांना मंत्रिपदावरून डच्चू देऊन त्याऐवजी नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाणार असल्याची माहिती समोर आली. यापूर्वी अधिवेशन काळातही शिंदेसेनेतील काही आमदारांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या भेटीसाठी पत्र दिले होते. या पत्रात स्वपक्षीय मंत्र्यांबरोबर अनेक आमदारांनी उघडपणे नाराजी बोलून दाखवल्याची चर्चा होती. त्याचबरोबर स्वपक्षीय मंत्र्यांशिवाय आम्हाला तुमची भेट घ्यायची असल्याची इच्छाही त्यांनी शिंदे यांना लिहिलेल्या पत्रात व्यक्त केली होती. यादरम्यान उपमुख्यमंत्री शिंदे हे लवकरच मोठा निर्णय घेणार असून मंत्रिमंडळात फेरबदल करणार असल्याचे सूत्रांनी सांगितले आहे. पक्ष संघटना न वाढवणाऱ्या मंत्र्यांना दिवाळीआधी घरचा रस्ता दाखवला जाऊ शकतो, तसेच राज्यमंत्रिपदावर असलेल्या काही मंत्र्यांची थेट कॅबिनेटमध्ये वर्णी लागू शकते, अशी माहितीही सूत्रांनी दिली आहे.

------------------------------------------

जल्लोष करतात, पेढे वाटतात, त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांच्यात काही माणुसकीच राहिली नाही, असं मला वाटतं, असा गंभीर आरोपही खासदार शिंदे यांनी केला.

प्रणिती शिंदे (Praniti Shinde) म्हणाल्या, नसरापुरातील नराधमाने चिमुकलीवर अत्याचार करून तिचा अत्यंत निर्घृणपणे खून केला. शक्ती कायदा लागू केला असता त्याला पंधरा दिवसांत फाशी झाली असती. त्याला लवकरात लवकर फाशी द्यावी, अशी आमची मागणी आहे. पण, मुख्यमंत्री फडणवीस यांनी जल्लोष करून पेढे वाटले, त्यावरून स्पष्ट होतं की 'पंतप्रधान, मुख्यमंत्र्यांपासून भाजप कार्यकर्त्यांपर्यंत सर्वाजण निवडणुकीसाठीच काम करतात. त्यांच्यासाठी निवडणुका हेच सबकुछ आहे.चिमुकलीवर अत्याचार होऊन वाईट पद्धतीने तिचा खून केला जातो, त्याची आठवण ठेवून भाजपने जल्लोष केला नसता. तसेच, चिमुकलीसाठी आम्ही जल्लोष करत नाही, असं म्हणाला असता तर तुमच्यात थोडीतरी माणुसकी शिल्लक आहे, असं आम्हाला वाटलं असतं. त्याउलट तुम्ही जल्लोष केला आहे. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी उद्घाटनाचे कार्यक्रम घेतले, असा आरोपही शिंदे यांनी केली.

त्या म्हणाल्या, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये काही माणुसकीच राहिली नाही, असं मला वाटतं. त्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला पाहिजे. नसरापूरची केवळच एकच घटना नाही तर सोलापुरात तीन दिवसांत दहा मर्डर झाले आहेत. कुठाय तुमचं प्रशासन, कुठाय तुमची कायदा आणि सुव्यवस्था?फडणवीस यांना गृहविभाग सांभाळता येत नसेल तर राजीनामा द्यावा किंवा दुसऱ्याकडे गृहखातं सोपवावं. त्या नराधमाचा फोटो पाहिल्यानंतर वाटतं की त्याला तिथंच काहीतरी करावं. त्याचे नातेवाईकही म्हणतात, आरोपीला आमच्या ताब्यात द्या, आम्ही कायदा हातात घेतो. म्हणजे आता डोक्यावरुन पाणी गेलं आहे, अशी खंतही प्रणिती शिंदे यांनी बोलून दाखवली.

त्या म्हणाल्या, महाविकास आघाडी सरकारने आणलेला शक्ती कायदा लागू करा. त्याची तुम्हाला कसली भीती आहे. पोक्सो अंतर्गत महिलांची ओळख सांगू शकत नाही. मात्र, सोलापुरात ते खुलेआम जाहीर केलं गेलं आहे. प्रशासनाच्या समोर या घटना घडतायत, त्यामुळे त्यांचीही मिलीभगत आहे.

नसरापूरमधील नराधमला फाशी झाली पाहिजे, शक्ती कायदा लागू करा. या नराधमावर पोक्सोच्या 2 ते 3 केसेस आहेत, हा सुटला कसा. एक महिला प्रतिनिधी म्हणून त्याचं वाईट वाटतं, अशी खंतही प्रणिती शिंदे यांनी व्यक्त केली.

त्या म्हणाल्या, सत्तर फुट रोडसारख्या ठिकाणी मर्डर होतो, इतकी कायदा आणि सुव्यवस्था कोलमडून पडली आहे. फक्त इलेक्शन आणि हवरटपणा सुरु आहे. फक्त इलेक्शनदरम्यान गुन्हे दाखल होतात. सध्या शहरात मटका आणि इतर अवैध धंदे जोरात सुरु आहेत.सत्ता त्यांची, प्रशासन त्यांच तरीसुद्धा त्यांना आमच्या सोबत येऊन विरोध दाखवावा लागतोय. कुठे नेऊन ठेवलाय हा महाराष्ट्र, फक्त खिसे कसे भरायचं एवढंच सत्ताधाऱ्यांचे सुरु आहे. प्रशासनावर मोठ्या प्रमाणावर दबाव असल्याने अधिकारी हे कॉम्प्रोमाईज झाले आहेत, असा आरोपही प्रणिती शिंदे यांनी केला.

-------------------------------------------

वाढदिवसानिमित्त त्यांच्या निवासस्थानी सौ गिरीकाभाभी पंडित, सौ अनुरुपाताई युधाजित पंडित यांनी औक्षण केले. याप्रसंगी जि.प. चे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, युवानेते रोहित पंडित, युवानेते यशराज पंडित, राजवीर पंडित, नयनतारा पंडित यांची उपस्थिती होती. बदामराव पंडित यांना शुभेच्छा देण्यासाठी सकाळपासूनच शहरासह ग्रामीण भागातील विविध क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांसह भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी त्यांच्या निवासस्थानी गर्दी केली होती. बदामराव पंडित यांना दिवसानिमित्त पुस्तके त्यासोबतच वृक्ष, शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन आलेल्या चाहत्यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी आलेल्या प्रत्येकाशी अस्थेवाईकपणे चर्चा केली. तालुक्यातल्या प्रत्येक गावात असलेल्या अडीअडचणी याचीही माहिती उपस्थितांकडून घेतली दिवसभर व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार व भाजप कार्यकर्त्यांची बदामराव पंडित यांच्या बंगल्यावर त्यांना शुभेच्छा देण्यासाठी मोठी गर्दी केली होती.

-----------------------------------

मोठ्या संख्येने उपस्थित राहून ताकद दाखवून द्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

मराठवाड्यातील महादेव कोळी, मल्हार कोळी समाजाला सध्या जातीचे प्रमाणपत्र आणि वैधता प्राप्त करून घेण्यासाठी जीवाचे रान करावे लागते. एव्हढे करूनही यश मिळत नाही. महादेव कोळी मल्हार कोळी या समाजाला सहज जातीचे प्रमाणपत्र मिळून वैधता मिळावी या प्रमुख मागणीसाठी समाजातील 8 बांधवांनी बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरु केले आहे. भर उन्हाळ्यात छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर हे तीव्र आंदोलन तीन दिवसांपासून सुरु असुन रोज वेगवेगळ्या जिल्ह्यातील समाजबांधव सहभागी होत आहेत. काल सोमवारी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिवघेण्या उन्हात 8 जणांचा अन्नत्याग

समाजाच्या अतिशय ज्वलंत प्रश्नांवर समाजातील 8 बांधवांनी जिवघेण्या उन्हात बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरु केले आहे. चंद्रहंस नलमले - निलंगा, अच्युतराव सोगे - सोनपेठ, शंकरराव गंगाधरे - परळी वैजनाथ, सौ. रेणुकाताई घोरपडे - पूर्णा, रोहिदास एम्बलवाड - पालम, गजानन चंदेवाड - अहमदपूर, सुभाष कांबळे - कळंब, संदीप गवळे - सिल्लोड हे समाजबांधव रविवार दि. 3 मेपासून अन्नत्याग आंदोलनास बसले आहेत.

या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी मराठवाड्यातील वेगवेगळ्या भागातील समाजबांधव मोठ्या संख्येने संभाजीनगरमध्ये दाखल होत आहेत. आज 5 मे मंगळवारी परभणी जिल्ह्यातील बांधवांनी आंदोलनात सहभाग नोंदविला.

चर्चेत तोडगा नाही, आंदोलनावर ठाम

दरम्यान आज मराठवाडा विभागातील चारही अनुसूचित जात पडताळणी समितीचे संशोधन अधिकारी आणि अन्नत्याग उपोषणकर्ते, अभ्यासक यांच्या सोबत सविस्तर चर्चा झाली. मराठवाड्यातील महादेव कोळी, मल्हार कोळी जमातीच्या पुराव्यांच्या बाबतीतही चर्चा झाली. पण तोडगा निघाला नाही. संशोधन अधिकारी आणि चारही सह आयुक्त यांच्यासोबत चर्चा करून आयुक्त पुणे आणि सचिव आदिवासी विभाग यांच्याकडे पत्रव्यवहार करून मार्गदर्शन मागून घेऊ असे उपोषण स्थळी जातपडताळणी समितीच्या अधिकारी यांनी आश्वासन दिले आहे. पण उपोषणकर्त्यांनी जोपर्यंत प्रश्नावर तोडगा निघत नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. आणि पुढील दिवसात ठरलेल्या नियोजनाप्रमाणे बाकीच्या जिल्ह्यातील (लातूर , नांदेड, बीड, धाराशिव, जालना आणि हिंगोली)बांधवांनी मोठ्या संख्येने उपोषण स्थळी येऊन पाठिंबा देण्याची आव्हान उपोषणकर्त्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

-------------------------------------------

घटनेचे ठिकाण पुणे असल्याने हा गुन्हा आता पुण्याच्या कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला आहे. पुण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलीस आता या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

एका जबाबदार पदावर असलेल्या व्यक्तीने आपल्याच कुटुंबावर अशा प्रकारे जीवघेणा हल्ला केल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. आता या प्रकरणात संबंधित मंत्री काय भूमिका घेणार आणि पोलीस आरोपीवर काय कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

-------------------------------------

अभ्यास करून विक्रेत्यांना दोषमुक्त ठेवण्याबाबत शासन विचार करत आहे. तसेच, 'साथी' (ड-ढकख) पोर्टलवरील नोंदींसाठी 15 दिवसांचा विलंब ग्राह्य धरला जाणार असून, या काळात कोणतीही दंडात्मक कारवाई केली जाणार नाही. बोगस निविष्ठा रोखण्यासाठी 'सेंट्रल कंट्रोल रुम' शेजारील राज्यातून येणारे अवैध कढइढ कापूस बियाणे आणि बोगस निविष्ठा रोखण्यासाठी राज्य सरकार आता 'सेंट्रल कंट्रोल रुम' स्थापन करणार आहे. तसेच, यासंदर्भात केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून मूळ उत्पादन केंद्रांवरच बंदी घालण्याची मागणी केली जाईल. बैठकीतील अन्य महत्त्वाचे निर्णय: मुदतबाह्य कीटकनाशके: कंपन्यांनी मुदतबाह्य साठा परत घेण्यासाठी 'माफदा' आणि उत्पादक कंपन्यांची संयुक्त बैठक घेऊन धोरण ठरवले जाईल. थकीत देयके: गुणवत्ता तपासणीसाठी घेतलेल्या नमुन्यांची विक्रेत्यांची प्रलंबित देयके देण्यासाठी आर्थिक तरतूद केली जाईल. डिजिटल पुरावा: युरिया आणि ऊ-झ च्या साठ्याची शहानिशा करण्यासाठी विक्रेत्यांनी अक्षांश-रेखांश (ङरीं-ङेपस) युक्त व्हिडिओ पुरावा ठेवल्यास तो ग्राह्य धरला जाईल. केंद्राकडे पाठपुरावा: खतांचे मार्जीन वाढवणे, ऋजठ पद्धतीने पुरवठा करणे आणि नवीन बियाणे व कीटकनाशके कायद्यातील जाचक तरतुदी सुधारण्यासाठी केंद्राकडे प्रस्ताव पाठवला जाईल. या बैठकीला आमदार सुधीर मुनगंटीवार, कृषी सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त सूरज मांढरे, 'माफदा'चे अध्यक्ष विनोद तराळ, सचिव विपीन कासलीवाल आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते. शेतकरी हितासाठी संघटना प्रशासनाला पूर्ण सहकार्य करेल, असे आश्वासन 'माफदा'च्या वतीने यावेळी देण्यात आले.

## पान 4 वरुन

काही करु शकत नाही," अशी उघड दादागिरी करत आरोपींनी पोलिसांना लक्ष्य केल्याचे समोर आले आहे. राहुल हजारी या आरोपीने पोलिसांशी हुज्जत घालत धक्काबुक्की केली आणि गळा पकडला. धारूर पोलीस पथक आरोपींच्या शोधात असताना ही चकमक झाली. अतिरिक्त पोलीस कुमक मागवल्यानंतर संतापलेल्या आरोपींनी अंधाराचा फायदा घेत पोलिसांच्या दिशेने दगडफेक सुरु केली. यातील एक मोठा दगड थेट उपनिरीक्षक भवर यांच्या छातीला लागल्याने ते जखमी झाले आहेत.या हल्ल्यात एकूण अमित कांताप्रसाद तिवारी आणि सुजय गोकुळसिंग चव्हाण यांना अटक करण्यात आली आहे. तर राहुल हजारी, अमित सद्देवाल आणि मोहन रहिकवाल हे फरार असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. रार झालेल्या राहुल हजारी आणि इतर साथीदारांच्या शोधासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. भरवस्तीत आणि कर्तव्यावर असलेल्या पोलिसांवर अशा प्रकारे हल्ले होत असल्यामुळे पोलीस दलाच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. गुन्हेगारांमध्ये कायद्याचा धाक उरला नसल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.सासरच्या जाचाला कंटाळून भाजप नेत्याने आपलं आयुष्य संपवल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे. दिल्लीतील नरेला भागातील भाजप मंडळ आणि बँक फील्ड मॅनेजर विनोद मिश्रा यांनी कौटुंबिक त्रासाला कंटाळत 1 मे रोजी उत्तर प्रदेशातील कानपूरमध्ये विष प्राशन करत आपले आयुष्य संपवले. मुख्य म्हणजे सासरवाडीच्या घरासमोर जाऊन त्यांनी आत्महत्या केली. मृत्यूपूर्वी सर्व घटना शेअर करत त्यांनी कुटुंबियांना आणि मित्रमंडळींना एक व्हॉइस रेकॉर्डिंग देखील शेअर केला ज्यात त्यांना मृत्यूसाठी पत्नी आणि सासरच्या मंडळींना आरोपी ठरवले.

----------------------------------------------

करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. प्रा. श्री एम. एल. देशमुख यांच्या वतीने सर्व शाखेतून प्रथम येणाऱ्या चि.शंतनु सुरेश मुंडे याचा सन्मान राशी देऊन विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कैवल्य कुलकर्णी, विनय गिरवलकर, सुंदर सोळंके, कु. साक्षी पाळवदे यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. जगतकर यांनी विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण गुणवत्ता मिळवित भविष्यात देखील वैद्यनाथ महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रास्ताविक प्रा.यु.आर. कांदे यांनी, सूत्रसंचालन डॉ.नयनकमार आचार्य यांनी केले, तर आभार उपप्राचार्य हरीश मुंडे यांनी मानले.

-----------------------------------------

न्यायाची मागणी केली आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे ग्रामीण भागात खळबळ उडाली असून अशा बोगस लग्न टोळ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

---------------------------------------

त्या ठिकाणी रणरणत्या उन्हात अथवा पहाटेपर्यंत रांगेत थांबण्याची वेळ येत आहे. एकीकडे इंधन टंचाईमुळे ही परिस्थिती निर्माण झालेली असतांना प्रशासनाकडून मात्र केवळ बैठकांचा फार्स करत आज 63 टँकर येणार, उद्या 90 येणार असे आकडे जाहीर केले जात आहेत. परंतु आलेले हे टँकर नेमके जातात कुठे? असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे. या परिस्थितीतून लवकर सुटका करावी अशी मागणी होत असतांना लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी मात्र या प्रश्नाकडे फारसे गांभीर्याने पाहत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

एकीकडे पेट्रोल आणि डिझेल पंपावर मिळत नसताना काळा बाजार करणाऱ्यांकडे मात्र याचा पुरेसा साठा पहायला मिळत आहे. ग्रामीण भागात चक्क किराणा दुकानातून पेट्रोल आणि डिझेल जादा दराने विकले जात आहे. यामध्ये काही पेट्रोल पंपचालकांची मिलीभगत असल्याचा आरोप देखील केला जात आहे. परीक्षा, लग्नसराई, शेती मशागतीचा कालावधी सुरु असताना जिल्ह्यात इंधन टंचाई जाणवत आहे. यावर प्रशासनाने युद्ध पातळीवर उपाययोजना करणे गरजेचे असतांना सलग आलेल्या सुट्ट्यांमुळे अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केले तर दुसरीकडे सर्वसामान्यांना मात्र त्रास सहन करावा लागला. पगारापुरते काम करणाऱ्या या अधिकाऱ्यांना आमचा त्रास काय कळणार? असा सवाल देखील यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे.

---------------------------------------

तीव्रतेमुळे नदीकाठच्या भागातील जलस्त्रोत पूर्णपणे आटले असून विहिरी आणि कूपनलिकांच्या पाणीपातळीत मोठी घट झाली आहे. यामुळे शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न 'आ' वासून उभा आहे. या नैसर्गिक आपत्तीत प्रशासनाने बघ्याची भूमिका न घेता युद्धपातळीवर हालचाली करणे गरजेचे आहे, असे बोर्डे यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.नदीकाठच्या सर्व गावांना या महाभयंकर उन्हात दिलासा देण्यासाठी जायकवाडी धरणातून पाणी सोडणे हाच एकमेव पर्याय उरला आहे. शासनाने आणि संबंधित जलसंपदा विभागाने या परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तात्काळ विचारविनिमय करावा आणि गोदावरी पात्रात पाणी मोकळे करावे, जेणेकरुन पशुधन आणि मानवी जीवन वाचवता येईल, असे आवाहन अनिल बोर्डे यांनी प्रशासनाला केले आहे.या मागणीमुळे आता प्रशासन काय पावले उचलते, याकडे संपूर्ण गोदावरी पट्ट्यातील ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

--------------------------------------

चि.शेख शेख जोहेब मौला 70.67 गुण घेवून द्वितीय तर कु.शेख सुहान गौस 69.50 गुण घेवून तृतीय येण्याचा मान मिळविला आहे.

अशा या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. एकनाथ मुंडे मार्गदर्शक डॉ. संतोष मुंडे तसेच पापनाथेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुलेखा मुंडे त्याचबरोबर महाविद्यालयाचे प्राचार्य आणि प्राध्यापक सर्वांनी परीक्षेतील सर्व यशवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

------------------------------

महेश सोमासे यांनी पत्नी आणि सासूला उद्देशून "तुला नांदायला पाठवले नाही, तर मी दोन्ही मुलींना डिझेल टाकून जाळून मारून टाकतो," अशी धमकी दिली. तितक्यावरच न थांबता त्यांनी दुचाकीला असलेल्या पिशवीतून पांढऱ्या रंगाचा डिझेलचा कॅन काढला आणि मृणाल (वय 5) व मृण्मय (वय 4) या दोन्ही चिमुरड्या मुलींच्या अंगावर डिझेल ओतले. त्यानंतर खिशातील काडीपेटी काढून मुलींना पेटवून देण्याचा प्रयत्न केला. यावेळी अश्विनी आणि त्यांच्या आईने आरडाओरडा केला असता, जवळच असलेले नातेवाईक आसाराम तान्हाबा चिंचोलकर हे धावून आले. त्यांनी महेश सोमासे यांच्या हातातील डिझेलचा कॅन आणि काडीपेटी हिसकावून घेतल्याने मोठा अनर्थ टळला. जाताना आरोपीने "नांदायला आली नाहीस तर तुला व माहेरच्या लोकांना जिवे मारून टाकीन," अशी धमकी दिली. या प्रकरणी अश्विनी सोमासे यांच्या फिर्यादीवरून पती महेश विष्णू सोमासे यांच्याविरुद्ध माजलगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

-----------------------------------------

विशेष लक्ष देण्यात येईल. अनुदानित, अंशतः अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांमधील शिक्षक व मुख्याध्यापकांचे विविध प्रश्न प्राधान्याने सोडवून आवश्यक त्या उपाययोजना तत्काळ राबविण्यात येतील, असे शिंदे यांनी स्पष्ट केले. तसेच, सेवानिवृत्त शिक्षकांची वैद्यकीय बिले वेळेत मंजूर करून त्यांचा जलद निपटारा करण्यात येईल. कार्यालयीन कामकाज अधिक सक्षम करण्यासाठी "झिरो पेंडन्सी" धोरण राबवून सर्व प्रकरणांचा वेळेत निपटारा करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी उपशिक्षणाधियंती शिंदे यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. धनंजय शिंदे यांच्या नियुक्तीमुळे शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढविण्याच्या दिशेने हे पाऊल महत्त्वाचे ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

--------------------------------------------

ॲड.सुरज शेटे यांच्या वतिनेही शाल, श्रीफळ, पेढे देऊन मोठ्या उत्साहात सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या

----------------------------------------------

उभारण्याची गरज अधोरेखित करण्यात आली.

तसेच ग्रामीण व शहरी भागातील महिलांसाठी रोजगारनिर्मिती वाढविणे, स्वयंरोजगाराला चालना देणे, तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने मिळावा यासाठी ठोस धोरण आखण्याचे आवाहनही करण्यात आले.

तृतीयपंथी समाजाच्या संदर्भात शिक्षण, आरोग्य व रोजगार या क्षेत्रांमध्ये विशेष योजना राबविण्याची गरज व्यक्त करण्यात आली. तृतीयपंथीयांना शासकीय नोकऱ्यांमध्ये आरक्षण देणे, स्वतंत्र कल्याण मंडळ स्थापन करणे, तसेच त्यांच्या ओळख, सन्मान आणि अधिकारांच्या संरक्षणासाठी कायदेशीर यंत्रणा अधिक बळकट करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

याशिवाय, महिलांसाठी सुरक्षित निवारा केंद्रांची संख्या वाढविणे, आरोग्य सुविधा अधिक सक्षम करणे आणि तृतीयपंथी व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व्यापक जनजागृती मोहिमा राबविण्याची आवश्यकता देखील नमूद करण्यात आली.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी या सर्व मागण्यांची गांभीर्याने दखल घेत संबंधित विभागांमार्फत योग्य ती कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिल्याची माहिती आयेशा शेख यांनी दिली.

महिला व तृतीयपंथी समाजाच्या हक्कांसाठी उचललेले हे पाऊल महत्त्वपूर्ण मानले जात असून, विविध स्तरांतून या उपक्रमाचे स्वागत करण्यात येत आहे.

----------------------------------------

# श्रद्धा आणि अंधश्रद्धा!

आज श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांच्यात संघर्ष म्हणण्यापेक्षा मतभेद असल्याचे जाणवून येते. ज्या गोष्टी श्रद्धेने केल्या जातात, त्या अंधश्रद्धा असल्याचे सांगितले जाते. मुळात हा अतिशय संवेदनशील प्रश्न आहे. श्रद्धा आणि अंधश्रद्धेला काय म्हणावे किंवा कोणत्या गोष्टी अंधश्रद्धा आहेत हे ती बाब स्पष्ट झाल्याशिवाय समजून येत नाही. अगदी ताजे उदाहरण म्हणजे नुकताच उघड झालेले रमेश खरात प्रकरण. तो जे करत होता ती निव्वळ अंधश्रद्धा होती हे कदाचित अनेकांनी समजूनसुद्धा त्याचा नाद सोडला नाही. त्याच्या जाळ्यात कोणकोण अडकले होते ते आता स्पष्ट होत आहे.साध्या गोष्टी लक्षात घेतल्या तरी आपल्याही लक्षात येईल, की या अंधश्रद्धा आहेत. उंबरठ्यावर शिंक आली असता काम होत नाही असे मानले जाते. मुळात शिंक येणे ही काही अंधश्रद्धा नाही. यामागे असलेली शास्त्रीय कारणे शाळेत असतानाच शिकलेली असतात. पण शिंक आली असता कामे होत नाही अशी मानसिकता लहानपणापासून मनात बसली असल्यामुळे आपण थोडे थांबतो. शिंक आल्यावर दोन पावले मागे येऊन मग बाहेर पडावे असे सांगितले जाते. शिवाय जवळपास ज्याने शिंक दिली त्यालाही दोन शब्द ऐकवले जातात. महत्त्वाच्या कामात विघ्न आणले असे सुनावले जाते. परंतु शिंक येणे हा नैसर्गिक प्रकार असून शिंकल्याने काही अघटित होत नाही किंवा कोणत्या अडचणीही येत नाही हे लक्षात घेणे आवश्यक आहे.भूत असणे हा एक प्रकार लोकांच्या मनात घर करून बसला आहे. विशेषतः स्मशानात भुतं असतात असा लोकांचा ठाम समज असतो.यासाठी काही संस्थांतर्फे जनजागरण करण्यात आले असले तरी ही भीती कुठेतरी मनात घर करून राहिली असतेच. त्यातच चिंचेच्या झाडावर भुतं असतात हा ठाम विश्वास असतो. मुळात दाट पानांच्या झाडांवर पक्षी घरटे बांधतात. त्यांचा निवास त्या झाडांवर असताना भुतं कशाला त्या झाडांवर राहतील? आणि आधी ती असायला तर पाहिजेत. याबाबतीत गोंदमाळ येथील एक जुनी घटना आठवते. साधारण 20 वर्षापूर्वीची ही घटना असेल. गोंदेमाळ गाव डोंगराळ भागात वसले आहे. रात्री भुतांची पालखी डोंगरात नाचते असा अनेक जणांचा समज झाला होता. रात्रीच्या वेळी ठिणग्या उडणे, ज्वाळा दिसणे असे प्रकार तेथे दिसायचे. लोकांना वाटायचे तेथे भुतांचे राज्य आहे. रात्री त्यांचा दरबार भरत असेल. पण अंधश्रद्धा निर्मूलन समितीने या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावायचे ठरवले. त्यांनी प्रत्यक्ष रात्री जाऊन तो प्रकार उघडकीस आणला. रात्री तेथे हातभट्टी दारू गाळण्याचा व्यवसाय चालायचा. त्यासाठी भट्टी पेटवली जायची. त्या भट्टीतील निखारे उडायचे. त्यामुळे आग आणि निखारे दिसायचे. समितीने पोलिसांच्या सहकार्याने तो प्रकार उघड करून लोकांना या अंधश्रद्धेपासून परावृत्त केले. मुळात आपले मन विचारी असते. पण एखादी गोष्ट मनाशी पक्की ठरवली, की त्याचा सहसा प्रतिवाद केला जात नाही कारण त्या गोष्टीचा ठसा मनावर पक्का उमटलेला असतो. जादूगार जादू करतो. त्यामागे कोणताही चमत्कार नसतो. हातचलाखी आणि शब्दांच्या ओघात प्रेक्षकांना खिळवून ठेवत जादूगार जादू दाखवत असतो. त्याचे कारण विज्ञान हेच असते. आज अनेक बाबा, बुवा भक्तीचा बाजार मांडतांना दिसतात. त्यांना ओळखणे महत्त्वाचे आहे. आजही गोंदवले, शिर्डी, शेगाव, अक्कलकोट अशा ठिकाणी कोणत्याही शुल्काशिवाय किंवा देणगीशिवाय भाविकांना दर्शन घेता येते. या ठिकाणी विनामूल्य महाप्रसाद भाविकांना दिला जातो. तरीही कामतसारख्या भोंदूंकडे लोक का वळतात हे न समजणारे कोडे आहे. मुळात या बाबा लोकांना अंगमेहनत करायची सवय नसते. विनासायास पैसा मिळवायचा असतो. भाविकांच्या लक्षात या गोष्टी येतात, पण त्यावेळी उशीर झालेला असतो. श्रद्धा अवश्य असावी, पण ती डोळस असावा..!!

**शिवाजी चौगुले**
**कागल-कोल्हापूर**

# ब्लॅकमेलिंगचा भयानक प्रकार!

## अंगणवाडी मदतनीस महिलेचे आक्षेपार्ह व्हिडीओ काढून वर्षभर शोषण




केज (जि. बीड): केज तालुक्यातील एका ग्रामीण भागात अंगणवाडी मदतनीस म्हणून कार्यरत असलेल्या 30 वर्षीय महिलेवर कळंब येथील एका नराधमाने मे 2025 पासून सातत्याने बलात्कार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आरोपी विकास लक्ष्मण खाडे (रा. संभाजीनगर, कळंब) याने पीडितेला लस्सीतून गुंगीचे औषध देऊन बेशुद्ध केले आणि तिचे आक्षेपार्ह फोटो व व्हिडीओ काढले होते. पीडित महिलेशी ओळख झाल्यानंतर आरोपीने तिला जाळ्यात ओढले. आक्षेपार्ह व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल करण्याची आणि जीवे मारण्याची धमकी देऊन तो पीडितेवर वारंवार बळजबरी करत होता. मे 2025 ते 22 एप्रिल 2026 या कालावधीत त्याने कळंबमधील बालाजी व प्रेरणा लॉज, केजमधील सागर व प्रताप लॉज तसेच पीडितेच्या राहत्या गावी नेऊन अत्याचार केले. पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीवरुन युसूफवडगाव पोलीस ठाण्यात विकास लक्ष्मण खाडे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिन्द्रनाथ शेंडगे यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेत तपासाला गती दिली. पोलिसांनी आरोपीला त्याच्या राहत्या घरातून अटक केली असून, केज न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भीमराव मांजरे करत आहेत.

# शरदचंद्र पवार राष्ट्रवादी च्या वतिने नवनिर्वाचित सरपंच शेख नशीब यांचा सत्कार



सिरसाळा : सिरसाळा ग्रामपंचायतीची नुकतीच सरपंच पदाची पोटनिवडणुक संपन्न झाली , ह्या निवडणूकीत शिवसेनेचे शेख नशीब 3250 मतांनी व 850 मतांच्या फरकांनी विजयी झाले. त्यांच्या ह्या विजया बद्दल सिरसाळ्यात शरदचंद्र पवार राष्ट्रवादीच्या वतीने अर्जुनेश्वर महाविद्यालय येथे भव्य सत्कार करण्यात आला, दरम्यान सत्कार करतांना तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे,युवक तालुकाध्यक्ष मुन्ना काळे,प्रा. अनिल जाधव,आशोक देशमुख, अजमत भाई मशाक,मिलिंद चोपडे,बाळासाहेब गरड,अन्वर शेख तसेच या दरम्यान महम्मद इनामदार, पुरी महाराज,गायकवाड सर,रुपनर सर आदी सह अनेक जण उपस्थित होते. शेख नशीब यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या.

# बीड हादरलं! धारूरमध्ये पोलिसांवर भीषण दगडफेक; पोलीस उपनिरीक्षक भवर जखमी




बीड जिल्ह्यातील धारूर येथे गुन्हेगारांना पकडण्यासाठी गेलेल्या पोलीस पथकावर आरोपींनी भीषण दगडफेक केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात पोलीस उपनिरीक्षक भवर हे जखमी झाले असून परिसरात तणावाचे वातावरण आहे. मध्यरात्री पेट्रोलिंगदरम्यान कर्तव्य बजावत असलेल्या पोलिस पथकावर मद्यधुंद टोळक्याने अचानक हल्ला केला. या हल्ल्यात पोलिस उपनिरीक्षक बाबासाहेब भवर थोडक्यात बचावले.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब भवर हे आपल्या पथकासह रात्रीच्या वेळी पेट्रोलिंग करत असताना त्यांच्या हॉटेल सुरु असल्याचे दिसले. पेट्रोलिंगदरम्यान संशयास्पद हालचाली दिसल्यानंतर पोलिसांनी संबंधितांना थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र, संतप्त झालेल्या टोळक्याने पोलिसांवरच दगडफेक सुरु केली. “आम्हाला कोणी

पान 3 वर

# गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांनी चारित्र्य व सद्गुणही जोपासावेत

## ‘वैद्यनाथ’ च्या गुणवंत सत्कार समारंभात श्री दत्ताप्पा इटके






परळी वैजनाथ,दि.5-जिद्द व परिश्रमातून मिळवलेली शैक्षणिक गुणवत्ता ही व्यक्तिमत्त्वाच्या चौफेर विकासासाठी आधारभूत मानली जाते. पण त्याबरोबरच विद्यार्थ्यांनी आधुनिक युगात उत्तम चारित्र्य व सद्गुणांचीही जोपासना करावी, असे आवाहन जवाहर शिक्षण संस्थेचे सचिव श्री दत्ताप्पा इटके यांनी केले.

संस्थेच्या येथील वैद्यनाथ महाविद्यालयात काल बारावी बोर्ड परीक्षेत विशेष विशेष प्राविण्य संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला . त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री इटके बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. व्ही. जगतकर हे होते. यावेळी माजी नगराध्यक्ष वैजनाथ जगतकर, उपप्राचार्य प्रा. डी. के. आंधळे , प्रा.हरीश मुंडे, प्राध्यापक प्रतिनिधी डॉ. पी. एल. कराड, पर्यवेक्षक डॉ. नयनकुमार आचार्य, समन्वयक यु.आर. कांदे, प्रा. एम. एल. देशमुख, प्रा डॉ एम. एन. रोडे त्यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी महाविद्यालयाच्या चारही विद्याशाखेतून प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकांसह अन्य विशेष गुणवत्ता प्राप्त

पान 3 वर

# बीड जिल्ह्यात बोगस लग्न करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश; अनेकांना लाखोंचा गंडा

## ग्रामीण भागातील तरुणांना टार्गेट करुन लाखो रुपयांची फसवणूक



गेवराई : बीड जिल्ह्यात बोगस लग्न लावून देणाऱ्या टोळीचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून ग्रामीण भागातील तरुणांना टार्गेट करून लाखो रुपयांची फसवणूक केली जात असल्याचे समोर आले आहे. यापूर्वीही अशा प्रकारे अनेक तरुणांची फसवणूक झाल्याचे समोर आले होते.

ताज्या घटनेत, गेवराई तालुक्यातील उमापूर येथील युवकाची फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणात धक्कादायक बाब म्हणजे, एका तरुणीचे याआधीच तब्बल आठ जणांशी लग्न लावण्यात आले होते. त्यानंतरही पैशाच्या लालसेपोटी एजंटमार्फत त्याच तरुणीचे नवव्या युवकासोबत पुन्हा लग्न लावून देण्यात आले.

या बनावट लग्नासाठी संबंधित युवकाकडून लाखो रुपये उकळण्यात आले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर पीडित युवक योगेश शिंदे (रा. उमापूर) यांनी बीड जिल्ह्यातील चकलांबा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. तसेच त्यांनी पोलीस अधीक्षकांकडे धाव घेत

पान 3 वर

# प्रशासन गार; सर्वसामान्य बेजार!

## ● इंधन टंचाईचा चौथा दिवस; अधिकारी बैठकांमध्ये मग्न



बीड : बीड जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून पेट्रोल व डिझेलची टंचाई जाणवत आहे. ज्या ठिकाणी पेट्रोल, डिझेल उपलब्ध आहे त्या ठिकाणी लांबच लांब रांगा लागलेल्या आहेत. तर अनेक ठिकाणी नो स्टॉकचे बोर्ड लागले आहेत. यामुळे सर्वसामान्य नागरिक बेजार झालेले असतांना प्रशासन मात्र एसीच्या हवेत गार असल्याने संताप व्यक्त होत आहे.

बीड जिल्ह्यात गेल्या महिनाभरापासून इंधन टंचाई जाणवत आहे. महिनाभरापूर्वी इंधन टंचाईमुळे सर्वसामान्य हैराण झाले होते, त्यानंतर काही काळ पुरवठा सुरळीत राहिला. परंतु आता पुन्हा एकदा पेट्रोल व डिझेल टंचाईला सर्वसामान्यांना सामोरे जाण्याची वेळ आली आहे. पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्यांचा हाता-पाया पडण्याची वेळ या सर्वांवर आली आहे. ज्या ठिकाणी पेट्रोल-डिझेल उपलब्ध आहे,

पान 3 वर

# गोदावरी पात्र कोरडे; जायकवाडीतून तात्काळ पाणी सोडण्याची ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांची मागणी



गेवराई (प्रतिनिधी) चालू वर्षी उन्हाळ्याची तीव्रता प्रचंड वाढली असून एप्रिल अखेर गोदावरी नदीचे पात्र पूर्णपणे कोरडे पडले आहे. याचा मोठा फटका राक्षसभुवन, शहागड आणि नदीकाठच्या गावांना बसत आहे. येथील भीषण पाणीटंचाई लक्षात घेता जायकवाडी धरणातून गोदावरी पात्रात तात्काळ पाणी सोडावे, अशी आग्रही मागणी ‘ग्राहक पंचायत महाराष्ट्र’चे जिल्हा उपाध्यक्ष अनिल गोविंदराव बोर्डे यांनी केली आहे.राक्षसभुवन हे महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून येथे राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक दर्शनासाठी येतात. मात्र, नदीपात्र कोरडे पडल्याने भाविकांना स्नानासाठी पाणी उपलब्ध नाही. केवळ भाविकच नव्हे, तर स्थानिक नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर झाला आहे. सर्वात विदारक परिस्थिती मुक्या जनावरांची असून, पाण्यासाठी ती वणवण भटकत आहेत. वेळेत पाणी न मिळाल्यास जनावरे मृत्युमुखी पडण्याची भीती अनिल बोर्डे यांनी व्यक्त केली आहे.उन्हाच्या

पान 3 वर

# पापनाथेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाचे 12 वी परीक्षेत घवघवीत यश

## 100 % निकालाची गरुड झेप

परळी (प्रतिनिधी):दिनांक 3 मे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या *शैक्षणिक वर्ष 2025-26 च्या इयत्ता 12 वी परीक्षेत श्रीनाथ मानव सेवा मंडळ संचलित पापनाथेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाने नेत्रदीपक यश संपादन केले आहे.*

महाविद्यालयाचा विज्ञान व कला दोन्ही शाखेचा 100 टक्के निकाल निकाल लागला आहे असून विज्ञान शाखेतून कु.थोंटे पृथा प्रशांत 80.50% गुण घेवून प्रथम, कु.मुंडे राधिका वैजनाथ 78.83% गुण घेवून द्वितीय तर कु. उंडे नेहा अजय 75.17 गुण घेवून तृतीय येण्याचा मान मिळविला आहे.

तसेच कला शाखेतून कु.बुचाले गायत्री बालासाहेब 76.50 % गुण घेवून प्रथम,

पान 3 वर

# बीड हादरले! पत्नी नांदायला येत नसल्याच्या रागातून पोटच्या दोन मुलींना पेटवून देण्याचा प्रयत्न



माजलगाव (जि. बीड) : पत्नी नांदायला येत नाही, या क्षुल्लक कारणावरून संतापलेल्या एका पित्याने आपल्या अवघ्या 4 आणि 5 वर्षांच्या दोन चिमुरड्या मुलींच्या अंगावर डिझेल ओतून त्यांना जिवंत जाळून मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना माजलगाव तालुक्यातील लहामेवाडी येथे घडली. या प्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात आरोपी पतीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी अश्विनी महेश सोमासे (वय 33, रा. टालेवाडी) या पतीसोबत झालेल्या किरकोळ भांडणामुळे सध्या माहेरी लहामेवाडी येथे राहत होत्या. 2 मे रोजी सायंकाळी 5 वाजेच्या सुमारास त्यांचे पती महेश विष्णू सोमासे हे दुचाकीवरुन दोन्ही मुलींना घेऊन लहामेवाडी येथे आले. त्यांनी अश्विनी यांना “नांदायला चल” असे म्हटले, त्यावर अश्विनी यांनी गावातील प्रतिष्ठित माणसे घेऊन बैठक करून भांडण मिटविण्यास सांगितले.

या बोलण्याचा राग आल्याने

पान 3 वर

# शिक्षक-विद्यार्थी हितासाठी गतिमान प्रशासनाचा संकल्प

## ➡ उपशिक्षणाधिकारी शिंदे यांचा अमरसिंह पंडित यांचेकडून सन्मान



बीड दि. 5 (प्रतिनिधी): धनंजय रामराव शिंदे यांनी उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) म्हणून दि. 4 मे रोजी कार्यभार स्वीकारला. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कार्यालयात तब्बल 14 वर्षे कार्य करताना मिळालेल्या अनुभवाच्या बळावर ते प्रशासन अधिक परिणामकारक करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

उपशिक्षणाधिकारी या पदाची नवीन जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांनी म्हटले की, शिक्षणाधिकारी (मा.) सौ. प्रियाराणी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व कामकाज पारदर्शक, गतिमान व परिणामकारक पद्धतीने राबविण्यात येईल. मुख्याध्यापक व शिक्षकांच्या समस्या तातडीने सोडवण्यासाठी

पान 3 वर

# ॲड.अशोक कवडे यांची अंबाजोगाई वकील संघाच्या अध्यक्ष पदी विजयी झाल्याबद्दल सत्कार संपन्न



घाटनांदुर प्रतिनिधी – अंबाजोगाई येथील जिल्हा न्यायालय वकील संघाच्या वार्षिक निवडणुकीत ॲड. अशोक बाळासाहेब कवडे यांनी भरघोस मतांनी यश मिळवून अध्यक्ष पदी विजयी मिळवल्याबद्दल ॲड . अशोक कवडे यांचा सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे तसेच गोरगरिबांच्या मदतीला धावणारे त्यामुळे यामुळे नागरिकांतून मोठ्या उत्सवात अभिनंदन करण्यात येत आहे त्यातच पत्रकार परमेश्वर वैद्य व

पान 3 वर

# महिला व तृतीयपंथींच्या प्रश्नांवर आयेशा शेख यांचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदन

## ● सुरक्षा, रोजगार, आरोग्य व सन्मानाच्या हक्कांसाठी विविध मागण्या







वडवणी (प्रतिनिधी) :

राज्यातील महिला तसेच तृतीयपंथी समुदायाच्या विविध समस्या शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी सामाजिक कार्यकर्त्या आयेशा शेख यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना सविस्तर निवेदन सादर केले. या निवेदनामध्ये महिलांच्या अडीअडचणींसह तृतीयपंथी समाजाच्या मूलभूत हक्कांबाबत ठोस आणि तातडीच्या उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा अत्यंत प्राधान्याने मांडण्यात आला. राज्यात वाढत्या अत्याचारांच्या घटनांवर कठोर कारवाई करण्याबरोबरच, जलदगती न्यायप्रक्रिया राबविणे आणि प्रत्येक जिल्ह्यात सक्षम व प्रभावी महिला संरक्षण यंत्रणा

पान 3 वर

# यशवंत (बाबु) पुरी यांचे अपघाती निधन



वडवणी - तालुक्याती पुसरा गावचे रहिवासी यशवंत (बाबु) पुरी यांचे अपघाती निधन झाले आहे. त्यांच्या जाण्याने पुसरा गावावर शोककळा पसरली असून एक हसमुख व्यक्तिमत्व हरपले आहे. त्यांच्या परिवाराला या कठीण प्रसंगातून सावरण्यासाठी शक्ती देवो. पुरी परिवाराच्या दुःखामध्ये दैनिक संघर्ष नेता परिवार सहभागी आहे.